# अभंग दिंडी

संकलक व विवेचक : कल्याण जोशी

तीर्थरूप

# बाबांना

तुमचंच तुम्हाला

# प्रस्तावना

दरवर्षी प्रमाणे या वर्षी आपली वारी आळंदीपासून ते पंढरपूरपर्यंत व्यवस्थित पार पडली, कारण हे सर्व करून घेणारा 'तो' आहे.

हे सर्व अभंग मी शोधतो म्हणण्यापेक्षा माझ्याकडून हे अभंग निवडून घेतले जातात. या प्रक्रियेमध्ये १५०-२०० अभंगाच वाचन सहज होऊन जाते. इतके अभंग वाचले जाणे हा मात्र माझा स्वार्थ.

कमीत कमी विवेचन लागणारे अभंग शोधताना अनेक चांगले अभंग घेता आले नाहीत याचे दुःख होते.

नेहमी इतके संदर्भ ग्रंथ हाताशी नसले तरी अनेक जणांनी शब्दांचा अर्थ समजून सांगितला. त्यांचे मनापासून आभार.

या दिंडीमध्ये मला अनेकांचे साह्य होते. रवी ढेंबरे यांनी दिंडीचे पान आकर्षक करण्यात मोलाचे साह्य केले आहे. अभंग व त्यांचे विवेचनाचे पहिले वाचक म्हणजे माझे बंधू केदार जोशी व पत्नी मेधा जोशी. त्यांनी सुचवलेल्या बदलामुळे कमीतकमी त्रुटीसह अभंग आपल्यापर्यंत पोहचतो.

आपल्याला ही वारी कशी वाटली हे नक्कीच कळवा, तसेच यामध्ये काही सुधारणा हव्या असतील तर त्या ही कळवा.

कल्याण जोशी

kalyan.joshi@gmail.com

9423260836

दमाम

तिथीः आषाढ शु. एकदशी १९४६, शिवशक ३५१

# अनुक्रमणिका

| दिवस | संत | प्रस्थान | मुक्काम |
|---|---|---|---|
| 1 | नामदेव | आळंदी | आजोळघर आळंदी |
| 2 | तुकाराम | आळंदी | पुणे |
| 3 | ज्ञानेश्वर | | पुणे |
| 4 | चोखामेळा | पुणे | सासवड |
| 5 | निळोबा | | सासवड |
| 6 | जनाबाई | सासवड | जेजुरी |
| 7 | निवृत्तिनाथ | जेजुरी | वाल्हे |
| 8 | भानुदास | वाल्हे | लोणंद |
| 9 | कान्होपात्रा | | लोणंद |
| 10 | ज्ञानेश्वर | लोणंद | तरडगाव |
| 11 | एकनाथ | तरडगाव | फलटण |
| 12 | तुकाराम | फलटण | बरड |
| 13 | सेनामहाराज | बरड | नातेपुते |
| 14 | सोयराबाई | नातेपुते | माळशिरस |
| 15 | मुक्ताबाई | माळशिरस | वेळापूर |
| 16 | वंका (बंका) | वेळापुर | भंडीशेगाव |
| 17 | सावतामाळी | भंडीशेगाव | वाखरी |
| 18 | नामदेव | वाखरी | पंढरपूर |
| 19 | तुकाराम | नगर प्रदक्षिणा | |

# अभंग दिंडी



## दिवस १ - प्रस्थान मंदिरातून
## संत नामदेव

आम्ही विष्णुदास सांडिली वासना ।। तुम्ही नारायणा कळो आला ।। १।।
अज्ञान बाळक ठकविला धुरु।। तैसा मी अधीरु नव्हे देवा ।। २।।
उपमन्यु बाळका दुधाचा पै छंद ।। तैसा मी मतिमंद नोहे देवा ।। ३ ।।
शरण आला तुज मूर्ख विभीषण ।। लंकाराज्य तेणे मागितले ।। ४।।
नामा म्हणे तुझे नलगे आम्हा काही ।। वास सदा देई चरणाजवळी ।।५।।

नामदेवरायांचा हा मागणीपर अभंग. देवाला काही तरी मागण्यासाठी केलेला हा अभंग. आम्ही वासना सोडली आहे, त्यामुळे तू आम्हाला कळून आला आहेस. महाराज धुव्र, उपमन्यु व विभीषण (बिभीषण) यांची उदाहरणे देतात. हे तिघेही निस्सीम भक्त. पण भक्त व संत यांच्या मागणीतील सूक्ष्म फरक महाराज दाखवून देत आहेत.



# अभंग दिंडी



दिवस २ - प्रस्थान आळंदी - मुक्काम पुणे
संत तुकाराम

पांडुरंगा काही आईकावी मात । न करावे मुक्त आता मज ॥
जन्मांतरे मज देई ऐसी सेवा । जेणे चरणसेवा घडे तुझी ॥
वाखाणीन कीर्ति आपुलिया मुखे । नाचेन मी सुखे तुजपुढे ॥
करूनी कामारी दास दीनाहुनी । आपुला अंगणी ठाव मज ॥
तुका म्हणे आम्ही मृत्युलोकी भले । तुझे चि अंकिले पांडुरंगा ॥

हा जगद्गुरूंचा मोक्षतुच्छतापर अभंग. महाराज स्वर्ग मागत नाहीत. कारण स्वर्गात देवाची सेवा कशी करणार? सेवा म्हणजे देवाचे कीर्तन. यासाठी महाराज दीनाहून दीन असा सेवक करण्याची मागणी करत आहेत. मृत्युलोकी देवाचा अंकित म्हणून राहणेच महाराज पसंत करतात.



# अभंग दिंडी



## दिवस ३ - मुक्काम पुणे
## संत ज्ञानेश्वर

सलिल पय जैसे । एक होऊनि मीनले असे ।
परी निवडूनि राजहंसे । वेगळे कीजे ।। १२७ ।।
की अग्निमुखे किडाळ । तोडोनिया चोखाळ ।
निवडिती केवळ । बुध्दिमंत ।। १२८ ।।
ना तरी जाणिवेच्या आयणी । करिता दधिकडसणी ।
मग नवनीत निर्वाणी । दिसे जैसे ।। १२९ ।।
की भूस बीज एकवट । उपणिता राहे घनवट ।
तेथ उडे ते फलकट । जाणो आले ।। १३० ।।
तैसे विचारिता निरसले । ते प्रपंचु सहजे सांडवले ।
मग तत्त्वता तत्त्व उरले । ज्ञानियांसि ।। १३१ ।।

उपदेशपर ज्ञानेश्वरीतील ही ओवी. योग्य विचार केल्यावर मिथ्या प्रपंचात ज्ञानी व्यक्ती सहजच अलिप्त राहू शकतो व ब्रह्मज्ञानी होतो, हे सांगण्यासाठी माउली अनेक उदाहरणे देतात. जसा राजहंस दूध व पाणी यातून दूध वेगळे करू शकतो. अग्नीच्या मदतीने सोनार हिणकस धातू सोन्यापासून वेगळा करतो. दही घुसळून लोणी मिळते किंवा धान्य पाखडून भूस वेगळे करता येते..



# अभंग दिंडी




## दिवस ४ - प्रस्थान पुणे - मुक्काम सासवड
## संत चोखामेळा

अखंड नामाचे चिंतन सर्व काळ ।
तेणे सफळ संसार होय जना ॥१॥
सर्व हे मायिक नाशिवंत साचे ।
काय सुख याचे मानितसा ॥२॥
निर्वाणी तारक विठोबाचे नाम ।
येणे भवश्रम दूर होय ॥३॥
चोखा म्हणे नाम जपे दिननिशी ।
येणे सदा सुखी होसी जना ॥४॥

१. साचे (साचा)-संचय; साठा २. भवश्रम- प्रापंचिक चिंता

चोखामेळा महाराजांचा हा नामपर अभंग. विठ्ठलाच्या नामाची महती महाराज सांगत आहेत. प्रापंचिक चिंता नाम साधनेतून दूर होतील.



# अभंग दिंडी



## दिवस ५ - मुक्काम सासवड
## संत निळोबा

येती जाती वर्षती मेघ । गगन ते अभंग जैसे तैसे ॥१॥
तैसीच ब्रम्हांडे अनेक होती जाती । स्वरुप तें अव्दैती अव्दैत ॥२॥
नाना नटिया नटवेष । परि तो आपणास भिन्न नव्हे ॥३॥
निळा म्हणे नानावस्त्राकार तंतु । दाउनी आपणांतु आपण ॥४॥

निळोबा महाराजांचा हा अद्वैतपर अभंग, दिसण्याच्या भेदामुळे जरी जीव व शिव यामध्ये फरक दिसत असला तरी ते एकच आहेत. रोज दिसणारे आकाश हे ढगांमुळे भिन्न भासत असले तरी ते आहे तसेच आहे. ब्रह्मांडे होतील व जातील पण आत्मस्वरूप क्षेत्र राहील. नटाने अनेक वेष धारण केले असले तरी तो एकच आहे. वस्त्रे भिन्न वाटत असली तरी त्याचा धागा एकसारखाच आहे. निळोबाराय म्हणतात, आपल्यातला आपण ओळखावा.



# अभंग दिंडी



## दिवस ६ - प्रस्थान सासवड - मुक्काम जेजुरी
## संत जनाबाई

माझा नामा मज देई । जीव देईन तुझे पायी ॥१॥
पुंडलिका भुलविले । तैसे माझिया बाळा केले ॥२॥
ते गा न चले मजपाशी । दे गा माझ्या नामयासी ॥३॥
तुझ्यासंगे जे जे गेले । ते त्वां जितेचि मारीले ॥४॥
विठ्ठल म्हणे गोणाबाई । नामा तुझा घेवोनिया जाई ॥५॥
हाती धरोनिया आली । दासी जनी आनंदली ॥६॥

जनाबाईंचा हा भक्तवत्सलतापर अभंग. विठ्ठलाने सर्व जगाला भुलवले आहे. माझ्या नामदेवरायांना पण तू भुलवले आहेस. त्याला परत दे. जे जे तुझपाशी आले ते जिवंतपणी मेले. जनाबाईंच्या अभंगात वरवर एक अर्थ असला तरी त्यात अनेक अर्थ असतात. ते अर्थ आपले आपण समजून घ्यायचे असतात.



# अभंग दिंडी



## दिवस ७ - प्रस्थान जेजुरी - मुक्काम वाल्हे
## संत निवृत्तिनाथ

हे व्यापूनि निराळा भोगी वैंकुंठ सोहळा । नंदाघरीं गोपाळा हरि माझा ।।१।।
न साहे सगुण अवघाचि निर्गुण । तो कृष्ण आपण गोवळासंगे ।।२।।
गायी चारी हरि मोहरी खांद्यावरी । वेणु नाना परि वातु असे ।।३।।
निवृत्ति गयनी कृष्ण जप तो अमुप जाण । सांगितली खूण गोरक्षाने ।।४।।

निवृत्तिनाथांचा हा अद्वैत सगुण भक्तीपर अभंग, या प्रकारचे अभंग कमी आहेत. वैकुंठात राहणारा परमात्मा गोपाळ बनून नंदा घरी आला आहे. कृष्ण जरी सगुण दिसत असला तरी तो कायम सगुण राहत नाही. गोपाळांसाठी कृष्ण बनून गायी चरवताना, खांद्यावर घोंगडी घेऊन; बासरीतून अनाहत नाद निर्माण करत आहे. गोरक्षनाथांनी गहिनीनाथांना जो कृष्ण जप दिला तोच मला गहिनीनाथांच्या कृपाप्रसादामुळे प्राप्त झाला.



# अभंग दिंडी



## दिवस ८ - प्रस्थान वाल्हे - मुक्काम लोणंद
## संत भानुदास

परलोकीची वस्तु पंढरीसी आली
ती दैवे फावली पुंडलिका ॥१॥
घेता देता लाभ बहूतांसी झाला
विसावा जोडला पांडुरंग ॥२॥
न करिता सायास वस्तुची आयती
वैष्णवी बहूती वेटाळिली ॥३॥
भानुदासस्वामी कृपेचा सागरू
विठ्ठल कल्पतरु वोळला आम्हा ॥४॥

१) वेटाळणे- जोंधळा उपटणे; खुडणे २) वोळणे-अनुकूल होणे

भानुदास महाराजांचा पंढरीपर अभंग, पुंडलिकाच्या कृपेमुळे अलौकिक वस्तू पंढरपुरात आली. त्याचा लाभ अनेकांना झाला. वैष्णवांनी त्या वस्तूचा पुरेपूर फायदा घेतला. विठ्ठल आम्हाला कल्पतरूसारखा अनुकूल झाला.



# अभंग दिंडी



## दिवस ९ - मुक्काम लोणंद
## संत कान्होपात्रा

माझ्या जीवीचे जीवन । तो हा विठ्ठल निधान ।।१।।
उभा असे विटेवरी । वाटी प्रेमाची सिदोरी ।।२।।
आळीयाची धणी । निवारितो चक्रपाणी ।।३।।
भेटा दयेच्या सागरा । विनवितसे कान्होपात्रा ।।४।।

संत कान्होपात्रा यांचा हा विठ्ठलपर अभंग. विठ्ठल माझे जीवन आहे. तो सर्वांना प्रेम वाटत असतो. त्याच्याकडे जो येतो त्यांची दुःखे तो निवारतो. अशा दयेच्या सागराला भेटा.



# अभंग दिंडी



## दिवस १० - प्रस्थान लोणंद - मुक्काम तरडगाव
## संत ज्ञानेश्वर

फळाचे बीज की बीजाचे फळ ।
म्हणौनि पत्र पुष्प मूळ चोजवेना ॥१॥
ऐसि हे रचना नकळे गा देवा ।
सिध्दांतु अनुभव साक्ष देतो ॥२॥
मृत्तिकेची पृथ्वी की पृथ्वीची मृत्तिका ।
या गति अनेका चोजवेना ॥३॥
बापरखुमादेविवरु निरंतरी ।
बाह्यअभ्यंतरी नांदतुसे ॥४॥

माउलींचा जगताचे अनादित्व सिद्ध करणारा हा अभंग. फळापासून बीज का बीजापासून फळ हा निर्णय केव्हाही लागणे शक्य नाही. मग मधले पान, फूल, मूळ यांचा निर्णय कसा करता येणार? त्याप्रमाणे जगाची रचना कशी झाली आहे. हे समजत नाही. माती पासून पृथ्वी झाली का पृथ्वीपासून माती झाली यांचा जसा निर्णय लागत नाही. तसे जग दिसते तसेच ते असेल असे काही नाही. तुझ्या स्वरूपाचा निर्णय लागत नाही. पण सतत ध्यान केल्यामुळे मात्र तू माझ्यात अंतर्बाह्य नांदत आहे. असे अनुभवाला येते.



# अभंग दिंडी



## दिवस ११ - प्रस्थान तरडगाव - मुक्काम फलटण
## संत एकनाथ

वरुषला मेघ खडकावरुता । चिखल ना तत्त्वता थेंब नाही ॥१॥
वाया तो प्राणी आला नरदेहा । गेला वाया पहा भक्तिविण ॥२॥
अरण्यांत जैशी सूकरें बैसती । तैसे मठाप्रती करुनी बैसे ॥३॥
उदय होतांची लपते उलुक । तैसे तो मूर्ख समाधि बैसे ॥४॥
एका जनार्दनी वाया गेले सर्व । संसार ना देव दोन्ही शून्य ॥५॥

१) उलुक - घुबड २) सूकर -डुक्कर

ढोंगी लोकांवर प्रहार करणारा हा शांतीब्रह्म नाथ महाराजांचा अभंग. दगडावर पाऊस पडून काय उपयोग? त्याच प्रमाणे या ढोंगी लोकांचा नरदेह वाया गेला. हे ढोंगी लोक मठात डुक्करासारखे बसून असतात. सगळेजण बघायला आले की समाधीची नाटके करतात. अशामुळे देव व संसार दोन्ही वाया जातो. आपल्याला नाथामहाराजांची परोपकारी आणि दयाळू बाजू माहीत आहेच. पण वेळप्रसंगी महाराज समाजाच्या डोळ्यात अंजन घालण्यासाठी कठोर शब्दाचा वापर लीलया करतात.

# अभंग दिंडी



## दिवस १२ - प्रस्थान फलटण - मुक्काम बरड
## संत तुकाराम

उंबरांतील कीटका हेचि ब्रम्हांड ऐसे लेखा
ऐसी उंबरे किती झाडी ऐशी झाडे किती नवखंडी
हेचि ब्रम्हांड आम्हांसी  ऐसी अगणित अंडे कैसी
विराटाचे अंगी तैसे  मोजू जातां अगणित केश
ऐशा विराटाच्या कोटी  साठविल्या जाच्या पोटी
तो हा नंदाचा बाळ मुकुंद  तान्हा म्हणवी परमानंद
ऐसी अगम्य ईश्वर लीळा  ब्रम्हानंदी गम्य तुकयाला

१) विराट- ब्रह्मांड देह

उंबरातल्या कीटकाला उंबर हेच ब्रह्मांड असं वाटतं. एकेका झाडाला अशी उंबरं किती असतील? आणि नऊ खंडात अशी झाडं किती असतील? आपल्यासाठी हेच ब्रह्मांड आहे, अशी अगणित ब्रह्मांडं कशी आणि किती आहेत? एकेका ब्रह्मांड देहात अनेकविध गोष्टी. असे अनेक ब्रह्मांड देह ज्याच्या पोटात साठवलेली आहेत तो नंदाचा बाल मुकुंद स्वतःला तान्हा म्हणवण्यात परमानंद मानतो. अशी ही ईश्वराची अगम्य लीला ध्यानातून समजून येते.



# अभंग दिंडी



## दिवस १३ -प्रस्थान बरड - मुक्काम नातेपुते
## संत सेनामहाराज

ऐकिले मागे तारिले बहुता।
धांवसी की आता नाम घेता ॥१॥
बरव्यापरी मज ऐसे कळो आले ।
म्हणउनी विठ्ठले करी धावा ॥२॥
पडिला विसरू माझा तुजलागी।
आता पांडुरंगी करणे काय ॥३॥
तुजलागि माझी नयेची करुणा ।
धरिले की जाण दुरी मज ॥४॥
सेना म्हणे आतां सांभाळी नारायणा ।
जाऊ पाहे प्राण तुजसाठी ॥५॥

सेनामहाराजांचा हा करुणापर अभंग. देवा तू अनेकांना तारले असे ऐकले होते. मी तुझा धावा करतो करतो पण तुला माझा विसर पडला आहे का? माझी करुणा तुला का येत नाही? तू जाणूनबुजून अस वागतो आहेस का? पण देवा तुलाच मला सांभाळून घ्यायचे आहे, आता मात्र माझा प्राण जातो आहे. सेनामहाराज आपल्या मनातील भावना व्यक्त करत आहे असेच वाटत आहे.



# अभंग दिंडी



## दिवस १४ - प्रस्थान नातेपुते - मुक्काम माळशिरस
## संत सोयराबाई

नाही उरली वासना । तुम्हा नारायणा पाहता ।।१।।
उरला नाही भेदाभेद । झाले शुध्द अंतर ।।२।।
विटाळाचे होते जाळे । तुटले बळे नामाच्या ।।३।।
चौदेहाची तुटली दोरी । म्हणे चोखयाची महारी ।।४।।

१) विटाळ- दोष, अपवित्रता २) चौदेह- चार प्रकारचे देह (स्थूळ, सूक्ष्म, कारण, महाकारण ) सोयराबाईंचा हा नामपर अभंग. नामाच्या साह्याने जीवनात अंतर्बाह्य बदलले असे सोयराबाई सांगत आहेत. नामामुळे वासना व दोषांचा नाश झाला. द्वैत-अद्वैतातील संघर्ष मिटला व चार ही देहाची शुद्धी झाली.



# अभंग दिंडी



## दिवस १५ - प्रस्थान माळशिरस - मुक्काम वेळापूर
## संत मुक्ताबाई

एक आपण साधू झाले। येर कोण वाया गेले ॥१॥
उठे विकार ब्रह्मी मूळी। अवघे मायेचे गा बळी ॥२॥
माय समूळ नुरे जेव्हां। विश्व ब्रह्म होइल तेव्हां ॥३॥
ऐसा उमज आदिअंतीं। मग सुखी व्हावे संती ॥४॥
चिंता क्रोध मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥५॥

मुक्ताबाईंचा माउलींना उपदेशपर (संत उपदेशपर) असा हा ताटीचा अभंग. आपण जेथे पोहोचला तेच बरोबर व इतर वाया असे जर साधूला वाटू लागले तर ते चुकीचे आहे. सर्व लोक हे विविध विकारांनी (षडरिपू) त्रस्त आहेत, त्यांचा तिरस्कार न करता त्यांची करुणा करावी. आपण ज्या ठिकाणी पोहोचलो तेथून इतरांना मार्ग दाखवता येईल का? असे वाटणे हे खरे साधूचे लक्षण होते. हे सर्व करण्याचे सामर्थ्य तुमच्यासारख्या एखाद्यातच असते ते वाया जाऊ देऊ नका. ताटी उघडा ज्ञानेश्वरा.



# अभंग दिंडी



## दिवस १६ - प्रस्थान वेळापूर - मुक्काम भंडीशेगाव
## संत वंका (बंका)

भक्तांची आवडी धरोनी हृषीकेशी ।
उभा पंढरीसी विटेवरी ॥१॥
नामदेवासाठी दूध पिये वाटी ।
मिराबाईचे घोटी विष स्वये ॥२॥
जनीचिया संगे दळूं कांडूं लागे ।
चोखामेळ्या संगे ढोरे वोढी ।३॥
वंका म्हणे ऐसा भक्तांचा आळुका ।
ज्ञानियाची देखा भिंत वोढी ॥४॥

१) आळुका - वखवखलेला; ध्यास, छंद घेतलेला देव भक्तासाठी काय काय करतो? यांची अनेक उदाहरणे वंकामहाराज देत आहेत. पुंडलिक, नामदेव, मिराबाई, जनाबाई, चोखामेळा, माउली यांच्या मदतीला जाण्याचा देवाला छंदच लागला आहे. असे महाराज सांगत आहेत. आळुका शब्दाला थोडी नकारात्मक झालर आहे. पण महाराजांनी तो शब्द अतिशय चपखलपणे देवाला विशेषण म्हणून वापरला आहे.



# अभंग दिंडी



दिवस १७ - प्रस्थान भंडीशेगाव - मुक्काम वाखरी
संत सावतामाळी

नामाचिया बळे न भीऊ सर्वथा ।
कळिकाळाच्या माथा सोटे मारू ॥ १ ॥
वैकुंठीचा देव आणू या कीर्तनी ।
विठ्ठल गाऊनी नाचो रंगी ॥ २ ॥
सुखाचा सोहळा करुनी दिवाळी ।
प्रेमे वनमाळी चित्ती धरू ॥ ३ ॥
सावता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा ।
तेणे भक्तिद्वार वोळंगती ॥ ४ ॥

वोळंगती -आश्रय घेणे

नामस्मरणाचे महत्त्व सांगणारा हा सावतामाळी यांचा अभंग. नामाच्या बळावर आपण वैकुंठाचा देव भूतलावर आणू शकतो. भक्तिमार्ग किती सहज व सोपा आहे हे महाराज सांगत आहेत.



# अभंग दिंडी



## दिवस १८ -प्रस्थान वाखरी - मुक्काम पंढरपूर
## संत नामदेव

वैकुंठासी आम्हा नको धाडू हरी ।
वास दे पंढरी सर्वकाळ ॥१॥
वैकुंठ कोपट जुनाट झोपडी ।
नको आडआडी घालू आम्हा ॥२॥
वैकुंठा जाऊनि काय बा करावे ।
उगेचि बैसावे मौनरुप ॥३॥
नामा म्हणे मज येथे ची हो ठेवी ।
सदा वास देई चरणा जवळी ॥४॥

पंढरीचे महत्त्व सांगणारा हा नामदेवरायांचा अभंग. आम्हाला वैकुंठाला पाठवू नकोस त्यापेक्षा पंढरपुरातच राहू दे. वैकुंठ चांगलं असेल पण पंढरपुरापुढे ती एक झोपडीच आहे. वैकुंठात शांत (मौन) बसावे लागेल. पंढरीत भजन कीर्तन करता येते. म्हणून महाराज म्हणतात मला इथेच तुमच्या चरणाजवळ सदा ठेवा.



# अभंग दिंडी



## दिवस १९ - आषाढी एकादशी पंढरपूर
## संत तुकाराम

दुडीवरी दुडी । चाले मोकळी गुजरी ॥
ध्यान लागो ऐसे हरी । तुझे चरणी तैशापरी ॥
आवतण्याची आस । जैसी लागे दुर्बळासी ॥
लोभ्या काळांतराची आस । बोटे मोजी दिवस मास ॥
तुका म्हणे पंढरीनाथा । मजला आणिक नको व्यथा ॥

१) आवतण - आमंत्रण २) काळांतर - व्याज

डोक्यावर घागरी घेतल्या असल्या तरी चालणारी स्त्री सहजतेने गप्पा मारत चालत असते. भिकारी जेवणाच्या आमंत्रणाची वाट आतुरतेने पाहतो. लोभी मनुष्य व्याजाने दिलेल्या पैशाचा हिशोब एकाग्र चित्ताने दिवस रात्र करत असतो. त्याचप्रमाणे मला सहजतेने, आतुरतेने व एकाग्र चित्ताने संसारात राहून तुझ्या चरणावर लक्ष लागू दे.

गेले १९ दिवस मी आपल्यापर्यंत वेगवेगळ्या संतांच्या (सद्गगुरूंच्या) रचना पोहचवणाऱ्या पोस्टमनच (वाहकाच) काम केले. माझी ही सेवा तुम्ही गोड मानून घेतली म्हणून तुमचे आभार. पुढच्या वर्षी नक्की भेटू.



हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा।।

।। राम कृष्ण हरी।।